**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawar
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary.stateboard@gmail.com
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 | Secretary(P) : 25651750

जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/ २८२८
दिनांक-१५/०६/२०२०.

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय** - माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस सन २०१९-२० मध्ये प्रविष्ठ होणा-या खेळाडू तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीच्या वाढीव गुणासाठीचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ** :-
१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.उमाशि-२०१५/ प्र.क्र.२६२/ एस.डी.२ दि.२०/१२/२०१८
२. शासन शुध्दीपत्रक क्र. उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ दि.२५/०१/२०१९
३ .शासन पत्र क्र.मंडळ-२०१६/प्र.क्र.२२०/एस.डी.-२ दि.१६ जानेवारी २०२०.
४ .क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे क्र.क्रीगुस/मागदर्शन/ १९- २०/का-४ दि.१५/०४/२०२० चे पत्र.
५. क्र.रा.मं./परीक्षा-७/२४७३, दिनांक २३/०४/२०२०रोजीचे पत्र
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक -उमाशी-२०२०/प्र.क्र.६२/एसडी-२, दिनांक २९/०४/२०२०.
७. शासन निर्णय क्र. उमाशी-२०२०/प्र.क्र.६२/एसडी-२, दिनांक १५/०६/२०२०.

उपरोक्त विषयी संदर्भिय क्र. १ चा शासन निर्णय व संदर्भिय क्र. २ या कार्यालयाचे पत्र पहावे. या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत शासनाने संदर्भिय क्र. १, दिनांक २०/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित नियमावली प्रसिध्द केलेली आहे. सदर नियमावली मधील अनुक्रमांक ९ अन्वये संबंधीत खेळाडू विदयार्थ्यांचे क्रीडा गुण सवलत मिळण्यासाठीचे प्रस्ताव दि.१ जानेवारी ते ५ एप्रिल पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करण्याबाबतची तरतुद केलेली आहे.तसेच अनुक्रमांक ९ अन्वये संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून पात्र प्रस्ताव शिफारशीसह विभागीय शिक्षण मंडळास दि.३० एप्रिल पर्यंत सादर करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

तथापि केंद्र व राज्य शासनद्वारा कोरोना (कोविड-१९) विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे खेळाडूंचे गुण प्रस्ताव तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांचे सवलतीचे प्रस्ताव संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करण्यास दि.२० मे, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तरी, अनेक विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर होऊ शकलेले नाही, त्यामुळे यासंदर्भात मा. लोकप्रतिनिधी व खेळाडू संघटना यांनी मंडळाकडे मुदतवाढ देण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्याअनुषंगाने शासनाने दिनांक १५ जून,२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार संबधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना खेळाडू विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव विहित नमुन्यात दि.२० जून २०२० पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करण्यास व संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करून दि.२५ जून २०२० पर्यंत संबंधित विभागीय मंडळ कार्यालयास शिफारशींसह सादर करण्यास मुदतवाढ दिलेली आहे. तसेच एन.सी.सी., व स्काऊट गाईड प्रस्तावांबाबतही या वाढीव मुदतीप्रमाणे कार्यवाही करावी. सदर शासन निर्णय केवळ सन २०१९-२० या एका शैक्षणिक वर्षाकरिता लागू राहिल. तसेच सदर मुदतवाढ ही अंतिम असून निकाल वेळेवर लावण्याच्या दृष्टीन यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

तरी उपरोक्त शासन पत्रानुसार सर्व विभागीय मंडळानी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन सदर बाबत प्रसिध्दी देण्यात यावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

सचिव
राज्यमंडळ, पुणे-४.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/वाढीव गुण सवलत/ 3941
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:-१७/०६/२०२०

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) सन २०१९-२०२० मध्ये प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू, एन.सी.सी, स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना **सवलतीचे वाढीव गुणासाठीचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबतचे** राज्य मंडळाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/२८२८ दि.१५/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी.

17/06/2020
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर –४१६००४
## ** प्रकटन **

**विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस सन २०१९-२०२० मध्ये प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू तसेच एन.सी.सी व स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीच्या वाढीव गुणासाठीचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत..**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या अखत्यारीतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेचे मुख्याध्यपक व क.महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २०/१२/२०१८ नुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्याची निर्धारीत मुदत ३० एप्रिल पर्यंत देण्यात आली होती.

तथापि केंद्र व राज्य शासनाद्वारा कोरोना (कोविड-१९) विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे खेळाडूंचे गुण प्रस्ताव तसेच एन.सी.सी व स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांचे सवलतीचे प्रस्ताव संबंधित जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करण्यास दि.२० मे २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.तरी अनेक विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर होऊ शकलेले नाहीत त्यामुळे यासंदर्भात मा.लोकप्रतिनिधी व खेळाडू संघटना यांनी मंडळाकडे मुदतवाढ देण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्याअनुषंगाने शासनाने शासन निर्णय क्र.उमाशि २०२०/प्र.क्र.६२/एसडी-२/मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई-३२ दिनांक १५ जून २०२० अन्वये संबंधित शाळा/क.महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना खेळाडू विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव विहीत नमुन्यात दि.२० जून २०२० पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करण्यास व संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन दि.२५ जून २०२० पर्यंत संबंधित विभागीय मंडळ कार्यालयास शिफारशींसह सादर करण्यास मुदतवाढ दिलेली आहे.तसेच एन.सी.सी. व स्काऊट गाईड विद्यार्थ्यांच्या प्रस्तावाबाबतही या वाढीव मुदतीप्रमाणे कार्यवाही करावी. सदर शासन निर्णय केवळ सन २०१९-२० या एका शैक्षणिक वर्षाकरीता लागू राहील. तसेच सदर मुदतवाढ ही अंतिम असून निकाल वेळेवर लावण्याच्या दृष्टीने यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

तरी मार्च-२०२० माध्यमिक शालांत (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ सर्व खेळाडू,एन.सी.सी., स्काऊट गाईड यामध्ये सहभागी होणार सर्व विद्यार्थी त्यांचे पालक, शिक्षक, मुख्याध्यापक,प्राचार्य सर्व माध्यमिक शाळा व क.महाविद्यालय यांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व शाळा व क.महाविद्याप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

17/06/2020

**(सुरेश आवारी)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

दिनांक :- १७/०६/२०२०